पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०५**

**सभावृत्तांत**

दिनांक - **०९/०८/२०१९** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०९/०८/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.साधना अंकुश मळेकर
५. मा.कदम निकीता अर्जुन
६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील

या शिवाय मा.झगडे – सहा.आयुक्त , मा.उल्हास जगताप - नगरसचिव,मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) सभा आयोजनाबाबत. – मा.सुजाता पालांडे , मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील पूरजन्य परिस्थितीचा विचार करता झोपडपट्टीमध्ये वास्तवास असलेल्या महिलांना व पूरबाधित महिलांना प्रत्यक्ष लाभ देणेबाबत.- मा.सुजाता पालांडे , मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील इयत्ता बालवाडी ते ३री तील विद्यार्थ्यांना बौध्दिक खेळणी व ते ठेवण्यासाठी अद्यावत कपाट खरेदी करण्याबाबत. – मा. सुजाता पालांडे , मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालवाडयांमधील मुलांना प्राथमिक शिक्षण विभागामार्फत विविध प्रकारची बौध्दीक खेळणी देणेबाबत. – मा.सुजाता पालांडे , मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुजाता पालांडे                    अनुमोदक – मा.अश्विनी चिंचवडे

भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री, दिल्ली राज्याच्या माजी मुख्यमंत्री व भारतीय जनता पक्षाच्या जेष्ठनेत्या सुषमा स्वराज यांचे नुकतेच निधन झालेले असलेने तसेच सांगली जिल्हयामध्ये बोट उलटून झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीना श्रध्दांजली वाहून मा.महिला व बाल कल्याण समिती दिनांक – ०९/०८/२०१९ रोजीची पाक्षीक सभा (कार्यपत्रिका क्रमांक ०५) शुक्रवार दिनांक - २३/०८/२०१९ रोजी दु.२.४५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**सभापती –** शुक्रवार दि.२३/०८/२०१९ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०५

**सभावृत्तांत**

( दिनांक ०९/०८/२०१९ ची तहकूब सभा )

दिनांक - २३/०८/२०१९ वेळ - दुपारी २.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक ०९/०८/२०१९ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक २३/०८/२०१९ रोजी दुपारी २.४५ वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.गोफणे अनुराधा देविदास
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.साधना अंकुश मळेकर
५. मा.कदम निकीता अर्जुन
६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अश्विनी चिंचवडे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महिला व बालकल्याण समितीची दि.२३/०८/२०१९ ची तहकूब सभा (कार्यपत्रिका क्रमांक ०५) ही माहिती घेण्यासाठी संबंधित अधिकारी सभागृहात उपस्थित नसल्याने सोमवार दिनांक २६/०८/२०१९ रोजी दु.३.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** सोमवार दि.२६/०८/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०५

**सभावृत्तांत**

( दिनांक ०९/०८/२०१९ व २३/०८/२०१९ ची तहकूब सभा )

दिनांक - २६/०८/२०१९ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक २३/०८/२०१९ ची तहकूब सभा सोमवार दिनांक २६/०८/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.कदम निकीता अर्जुन
५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

भारताचे माजी अर्थमंत्री व भाजपाचे जेष्ठ नेते अरुण जेटली यांचे नुकतेच निधन झालेले असलेने आजचे सभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन सदर सभा आज दिनांक २६/८/२०१९ रोजी दुपारी ३.३५ वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**सभापती** – सदर सभा दिनांक २६/०८/२०१९ रोजी दुपारी ३.३५ वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०५

**सभावृत्तांत**

( दिनांक ०९/०८/२०१९, २३/०८/२०१९ व २६/०८/२०१९ दु.३.०० वा. ची तहकूब सभा )

दिनांक - २६/०८/२०१९ वेळ - दुपारी ३.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक २६/०८/२०१९ ची दु.३.०० वा. ची तहकूब सभा सोमवार दिनांक २६/०८/२०१९ रोजी दुपारी ३.३५ वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.कदम निकीता अर्जुन
५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **२६/७/२०१९** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ९ विषय क्रमांक - ०१
दिनांक – २६/०८/२०१९
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा. अश्विनी चिंचवडे-पाटील
संदर्भ : मा.सुजाता पालांडे ,मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा यापुढे प्रत्येक महिन्याचे दुस-या व चौथ्या गुरुवारी दु.२.३० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक - ०२
दिनांक – २६/०८/२०१९
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे
संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

सन २०१९-२० या सालामध्ये पिंपरी चिंचव महानगरपालिका हद्दीत अनेक झोपडपट्टी धारक वास्तव्यास असून शहरामध्ये सर्वत्र पूरजन्य परिस्थिती झाली असल्याने त्यामधील वास्तव्यास असलेल्या गोर-गरीब जनतेचे दैनंदिन जीवनमान अस्थाव्यस्त परिस्थिती निर्माण

झाल्याने त्यांचे दैनंदिन जीवनमान पूर्ववत होणेसाठी महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टीत वास्तव्य असलेल्या महिलांना लाभ देण्यास मान्यता देण्यास त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील घोषित अघोषित झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व महिलांना व शहरातील पूरबाधित महिलांना त्यांचे कुटूंबियांच्या नावे असलेला फोटो पास अथवा स्वत:चे आधार कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा ग्राहय मानून त्याआधारे रोज वापरासाठी सदर पुढील साहित्य शासनाच्या दि.०५/१२/२०१६ च्या DBT योजनेअंतर्गत नमूद नसल्याने दिनांक – ०२/०८/२०१९ च्या शासन दर करारातील अ.क्र.९क प्रमाणे दोन चादर व अ.क्र.८ब प्रमाणे दोन बॅरेक कंबल व अ.क्र.५अ प्रमाणे दोन दरी पंजा व अ.क्र.३अ प्रमाणे दोन बेडशीट संच हा प्रत्येक महिलेस वरील प्रमाणे एक संच (२ चादर,२ बॅरेक कंबल , २ दरी पंजा व २ बेडशीट) उपलब्ध करुन देणेकामी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, दि पतंगनगर गार्डन व्हयू को-ऑप हौसिंग सोसायटी लि. शशांक २२५/५९५८ पतंगनगर, घाटकोपर(पूर्व) मुंबई ४०० ०७५ यांचेकडून शासनाच्या दर करारानुसार खरेदी करुन उपलब्ध करुन देणेस व त्याकामी सर्व खर्च नागरवस्ती व विकास योजना विभागाकडे २०१९-२० या अंदाजपत्रकातील पान क्र.३३२ क्र.४ मधील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखा-शीर्ष अ.क्र.१३ इतर योजना कार्यक्रम या उपलेखाशिर्षावरील तरतुदी मधून करण्यास तसेच त्याकामी लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्यास दिनांक ३१/०३/२०२० अखरे पर्यंतच्या कालावधीत सदर योजना राबविणेकामी आवश्यकतेनुसार विभागातील व इतर विभागातील लेखाशिर्षावरील अखर्चित /शिल्लक तरतुदीमधून रक्कम नागरवस्ती व विकास योजना विभागातून इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशीर्ष अ.क्र.१३ इतर योजना कार्यक्रम या लेखाशिर्षावर वेळोवेळी प्राधान्याने वर्ग करण्यास अथवा सुधारित अंदाजपत्रकात याकामी आवश्यक तरतूद उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यास तसेच यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६ नुसार मान्यता देण्यास तसेच उपरोक्त संस्थेबरोबर करारनामा करण्यास व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदरचा ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - ०३

दिनांक – २६/०८/२०१९

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील बालवाडीच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनीसाठी बौध्दिक खेळणी मध्यवर्ती भांडार विभाग मार्फत निविदा सूचना क्र.२०१७/१८ अन्वये खरेदी करण्यात आली होती. सदर बौध्दिक खेळणी घेतल्यामुळे मुलांच्या कार्यक्षमतेमध्ये व उपस्थिती मध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तरी सदर बौध्दिक खेळणी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ संपत असताना देण्यात आली होती. त्यानुसार मागील वर्षी ही सदर बौध्दिक खेळणी देण्याबाबत ठराव करण्यात आला होता. त्यानुसार नव्याने बौध्दिक खेळणी घेतली गेली नाहीत. तसेच प्राथमिक शिक्षण विभाग यांनी दिनांक २१/०५/२०१८ च्या पत्राच्या मागणीनुसार इ. १ ली ते इ. ३री विद्यार्थ्यांसाठी बौध्दिक खेळण्यांची मागणी महिला बाल कल्याण विभागाकडे केली असल्याने त्वरित प्राथमिक शिक्षण विभागामार्फत यापूर्वी त्यांनी दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे खरेदी करण्याची निविदा कार्यवाही करण्यास व त्यानुसार लेखाशिर्ष पान क्र.३३१ योजनेचे नाव – मदर तेरेसा शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील / प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगीण

विकासात्मक योजना अ.क्र.२८ व २९ खर्च करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदरचा ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - ०४

दिनांक – २६/०८/२०१९

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अश्विनी चिंचवडे-पाटील

संदर्भ : मा.सुजाता पालांडे ,मा. अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालवाडयांमधील मुलांना प्राथमिक शिक्षण विभागामार्फत विविध प्रकारची बौध्दिक खेळणी देणे(कपाटासहीत) तसेच याबाबतची संपुर्ण प्रशासकीय कार्यवाही व खेळणी वाटप प्राथमिक शिक्षण विभागामार्फत करणेस तसेच खरेदीकामीची संपूर्ण प्रक्रीया मध्यवर्ती भांडार विभाग व साहित्यांची तांत्रिक तपासणी आय.टी.आय विभागामार्फत करणेत येवून याकामी आवश्यक असणारी तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बालकल्याण योजनेअंतर्गत असणा-या मदर तेरेसा-शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील / प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगीण विकासात्मक योजना या उपलेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावप्रमाणे अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/३/कावि/३८५/२०१९
दिनांक : २७/०८/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.